## नियमित दिवाणी दावा क्र. ४०७/२०१५ मध्ये निशाणी १५५ खालील आदेश

**(MHST070028722015)**

शंकर तुकाराम थोरात वगैरे --- वादी

वि.

सुभाष राघू लोहार वगैरे --- प्रतिवादी

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वादीतर्फे साक्षीदार क्र. ५ संजय थोरात निशाणी १४८ चे सरतपासावर "उलटतपास नाही" चा झालेला आदेश रद्द होवून उलटतपास घेण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जावर वादीचे म्हणणे मागविण्यात आले.

२. प्रतिवादीचे कथन आहे की, प्रतिवादींचे वकील परगावी असलेने व त्यांना नेमली तारखेची माहिती नसलेने न्यायालयात हजर राहू शकले नाहीत. त्यामुळे दि.१८/०६/२०२५ रोजी नि.१४८ चे वादीतर्फे साक्षीदार क्र. ५ यांचे सरतपासावर "उलटतपास नाही" चा आदेश पारीत झाला. परंतु, सदर साक्षीदाराचा उलटतपास घेणेचा आहे. सबब, त्यांचेविरुध्द "उलटतपास नाही" चा झालेला आदेश रद्द करण्याची विनंती त्यांनी केलेली आहे.

३. सदर अर्जास वादीने आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतलेली आहे. वादीचे कथन आहे की, अर्जातील मजकूर खोटा व लबाडीचा आहे. सदर अर्जातील कारणे संयुक्तीक नाहीत. प्रतिवादींनी वादींना त्रास देण्याच्या हेतूने व दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्याचे हेतूने उलटतपास घेतलेला नाही. सबब, सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. निशाणी १५५ वरील अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसते की, वादीतर्फे साक्षीदार क्र. ५ यांचा नि.१४८ वर दि.२८/०१/२०२५ रोजी सरतपास दाखल केलेले असून प्रतिवादींनी नि.१४८ वर

उलटतपास घेणेकरीता पुरेशी संधी दिली गेलेली होती. परंतु, प्रतिवादींनी उलटतपास न घेतल्याने त्यांचेविरुध्द दि.१०/०४/२०२५ रोजी "उलटतपास नाही" आदेश पारीत करणेत आला आहे. प्रतिवादींनी नि. १५२ वरील अर्ज देवून सदरील "उलटतपास नाही" असा आदेश रद्द करण्याचा विनंती अर्ज केला. नि.१५२ वरील दि. २९/०४/२०२५ रोजी र.रू. २००/– च्या खर्चावर प्रतिवादींचा अर्ज मंजूर करण्यात आला. त्यानंतर देखील प्रतिवादींनी उलटतपास न घेतल्याने दि. १८/०६/२०२५ रोजी "उलटतपास नाही" चा आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादींना वारंवार संधी देण्यात आली. परंतु, प्रतिवादींनी साक्षीदाराचा उलटतपास घेतला नाही.

**५.** दाव्याचे स्वरूपा पाहता, उभयपक्षांना आपली बाजू मांडण्याची व त्या अनुषंगाने उलटतपास घेण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे न्यायाचे दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणे योग्य व न्याय्य आहे. तसेच अर्ज मंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु, प्रतिवादींच्या दिरंगाईमुळे वादीस झालेला त्रास लक्षात घेता सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करणे योग्य होईल. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अर्ज (निशाणी १५५) रुपये १०००/– (अक्षरी रूपये एक हजार फक्त) खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादींनी वादीस खर्च रुपये १०००/– दिल्यानंतर प्रतिवादींना उलटतपास घेणेस परवानगी देण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ASHA VISHAL MOHITE
Date: 2025.07.28 15:22:15 +0530

कराड. (श्रीमती ए.व्ही.मोहिते )

दि. २८/०७/२०२५. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कराड.

ता. कराड, जि.सातारा.